महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी क्र:०२२-६८५९७४८६, ई-मेल :desk18@dtemaharashtra.gov.inवेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

अतितात्काळ-स्पीड पोस्ट /ई-मेलद्वारे

क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/ ७८
दिनांक : ०४/०३/२०२१

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यवाहीबाबत....

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७ दि. ०३/१२/२०२०
२) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/१३ दि. १३/०१/२०२१
३) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/४६ दि. ११/०२/२०२१
४) या या कार्यालयामार्फत डीबीटी पोर्टलवरील योजनांबाबत घेतलेली V.C.बैठक दि. १२/०२/२०२१
५) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/व्ही.सी./२०२१/५९ दि. २४/०२/२०२१
६) या कार्यालयाचे अ.शा.पत्र क्रमांक : १८/तंशिसं/डीबीटी/२०२१/ ६४ दि. ०१/०३/२०२१
७) सामान्य प्रशासन विभाग (मा.तं.) यांचे पत्र क्र.डीबीटी २०१८/प्र.क्र.४७/से-१/३९ दि.०१/०३/२०२१

उपरोक्त १ ते ६ च्या संदर्भीय पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टल दि.०३/१२/२०२० पासून शासनाकडून सुरु करण्यात आलेले असून तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत सर्व विभागीय कार्यालयांमार्फत त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी त्वरीत, पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्याबाबत तसेच संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे योजनांचे अर्ज प्रलंबित न ठेवता योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी करुन निकाली काढावे अशा सूचना देण्याबाबत या कार्यालयाकडून कळविण्यात आलेले आहे.

डीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना आधार बेस्ड व नॉन आधार बेस्ड असे दोन पर्याय उपलब्ध असून मागील वर्षी काही विद्यार्थ्यांनी योजनेसाठी आधार बेस्ड व नॉन आधार बेस्ड अशा दोन्ही पर्यायांतर्गत अर्ज भरल्याचे व संस्थांकडून मंजूर करण्यात आल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देतेवेळी तांत्रिक बाबी निर्माण झाल्या आहेत.

तरी ही वस्तुस्थिती लक्षांत घेता, सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना सूचित करावे की, संस्थेमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकडून योजनांचे नॉन आधार बेस्ड अर्ज न भरता आधार बेस्ड अर्ज भरुन घ्यावेत. तसेच सदर आधार बेस्ड अर्ज विद्यार्थ्यांकडून ऑनलाईनरित्या अंतिम ( Submit ) करतेवेळी विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्नित असणे पूर्वापेक्षित (Prerequisite) आहे.

तसेच विद्यार्थ्यांने आधार बेस्ड व नॉन आधार बेस्ड असे दोन्ही प्रकारचे अर्ज ऑनलाईनरित्या भरुन अंतिम केले असल्यास, संस्थेने संस्थास्तरांवरुन नॉन आधार बेस्ड अर्ज रद्द करावा. संस्था स्तरांवरुन विद्यार्थ्याने भरलेले दोन्ही प्रकारचे अर्ज ऑनलाईनरित्या पुढील कार्यवाहीसाठी पाठविल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्यांची राहिल.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई.

Desk-18\Minority Cell\Shaskiya Patra\From 2020-21\RCSM\Letter to RO

पृष्ठांकन क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२०/ 520
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती.
दिनांक : 5/3/2021



(डॉ.आर.पी.मोगरे)
सहसंचालक,तंत्रशिक्षण वि.का.
अमरावती.

**प्रत:** १.प्राचार्य, सर्व शासकीय / शासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी,पदवी व पदव्युत्तर पदवीअभ्यासक्रमांच्या संस्था अमरावती विभाग,अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित
२.प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.